# युवाराष्ट्र दर्शन

RNI No. MAHMAR/2008/26657 E-mail : yuvarashtradarshan.com

नागपूर, रविवार, दिनांक १८ जानेवारी २०२६ ■ वर्ष १७ ■ अंक ३२६ ■ पाने ८ ■ किंमत रु. २/- वितरण खर्च रु.१ = एकूण ३ रुपये


## काँग्रेसमध्ये जाण्याची इच्छा व्यक्त करताच भाजपा नेत्याच्या घरावर धाड



**वृत्तसंस्था**
**बासवाडा, दि. १७**

काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याची इच्छा व्यक्त केल्यानंतर अवघ्या ४८ तासांतच भाजपा नेत्याच्या घरावर भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाने अचानक धाड टाकली. बासवाडा जिल्ह्यात घडलेल्या या प्रकारामुळे राजस्थानच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली. महेंद्रजीत सिंह मालवीय असे या भाजपा असून त्यांच्याशी संबंधित तीन मालमत्तांवर मंगळवारी छापेमारी करण्यात आली आहे. यापार्श्वभूमीवर हे प्रकरण नेमके आहे तरी काय? कोण आहेत महेद्रजीत सिंह मालवीय? त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याची इच्छा का व्यक्त केली? त्याविषयीचा हा आढावा

२०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीपूर्वी महेंद्रजीत सिंह यांनी काँग्रेसची साथ सोडून भारतीय जनता पक्षाचे कमळ हाती घेतले होते. मात्र, रविवारी (११ जानेवारी) त्यांनी भाजपाला सोडचिठ्ठी देऊन पुन्हा काँग्रेसमध्ये परतण्याचे संकेत दिले. त्यासाठी मालवीय यांनी काँग्रेसचे राजस्थान प्रभारी सुखजिंदर सिंह रंधावा व प्रदेशाध्यक्ष गोविंद सिंह डोटासरा यांची भेटही घेतली. मी काँग्रेसमध्ये परतण्याचा निर्णय घेतला आहे आणि माझ्या समर्थकांचीही हीच इच्छा आहे, असे त्यांनी माध्यमांना सांगितले. यादरम्यान मालवीय यांनी घरवापसीची घोषणा करताच दोन दिवसांत त्यांच्या घरावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने धाड टाकून चौकशीचा ससेमीरा लावला आहे.

काँग्रेसच्या नेत्यांनी ही कारवाई राजकीय सूडबुद्धीने प्रेरित असल्याचा आरोप केला आहे. राजस्थानमध्ये यापूर्वीही काँग्रेसच्या अनेक वरिष्ठ नेत्यांशी संबंधित मालमत्तांवर छापेमारी करण्यात आली होती. त्यातील एका प्रकरणात माजी मंत्री यांना अटक करण्यात आली; तर दुसऱ्या प्रकरणात माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांचे स्वीय सहायक लोकेश शर्मा यांची दीर्घकाळ चौकशीही करण्यात आली होती. मात्र, महेंद्रजीत सिंह मालवीय यांच्यावर झालेली ही कारवाई अत्यंत असामान्य मानली जात आहे. त्यामागचे कारण म्हणजे-मालवीय यांनी भाजपा सोडून काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचे संकेत दिल्यानंतर दोन दिवसांतच ही कारवाई झाली आहे.

# शिंदेंचा पक्ष फोडून भाजपा मुंबईचा महापौर बसवेल : उद्धव ठाकरे

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १७**

शिवसेनेचे (ठाकरे) नेते उद्धव ठाकरे यांनी आज पत्रकार परिषद घेऊन मुंबई महानगरपालिकेसह राज्यातील महानगरपालिका निवडणुकांचे विश्लेषण केले. मुंबई महापालिकेत ठाकरे बंधूंच्या युतीला बहुमताचा आकडा गाठता आलेला नाही. शिवसेनेला (ठाकरे) ६५ तर राज ठाकरेंच्या मनसेला केवळ ६ जागा जिंकता आल्या. तर भाजपा ८९ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष झाला आहे. त्यानंतर शिंदेंच्या शिवसेनेला २९ जागा मिळाल्या आहेत. महायुतीची संख्या ११८ पर्यंत पोहोचत असल्यामुळे महायुतीचा महापौर बसणार हे नक्की झाले आहे. भाजपाला महापौर पद मिळवायचे असेल तर शिंदेंच्या शिवसेनेचा पाठिंबा लागणार आहे. त्यामुळे महापौर पदावर दावा करणार का? असा प्रश्न उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना काल विचारण्यात आला





होता. यावर महायुतीचा महापौर होईल, असे सांगून शिंदेंनी थेट उत्तर देणे टाळले होते. दरम्यान एकनाथ शिंदे यांच्या पक्षाच्या विजयी नगरसेवकांना ताज हॉटेलमध्ये ठेवण्यात आले आहे. त्यावरून विविध आडाखे बांधले जात आहेत.

शिवसेनेचे (शिंदे) निवडून आलेले नगरसेवक ताज हॉटेलमध्ये ठेवण्यात येणार आहेत. याबद्दल उद्धव ठाकरेंना प्रश्न विचारला असता ते म्हणाले, त्यांना भाजपाची भीती वाटते. एकदा फुटलेले लोक पुन्हा फुटू शकतात. सर्वच लोक सर्वांच्या संपर्कात असण्याची शक्यता आहे. शिंदे गटाचे जितके नगरसेवक निवडून आले आहेत, त्यातील बरेच आमच्यातील फोडलेले नगरसेवक आहेत. भाजपा महापौर पदासाठी त्यांचे नगरसेवक फोडू शकते, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे २४ नगरसेवक निवडून आलेले आहेत. काँग्रेसशी आघाडी झाली असती तर लाभ झाला असता का? असा प्रश्नही उद्धव ठाकरेंना विचारण्यात आला. यावर उद्धव ठाकरे म्हणाले, आत्या बाईला मिश्या असत्या तर अशी मराठीतील म्हण याला लागू होते.''

तसेच मागच्यावेळी आमचे ८४ नगरसेवक निवडून आले होते. शाह सेना केल्यानंतर आमचे जवळपास ५४ नगरसेवक फोडण्यात आले. तरी आमचे ६५ नगरसेवक निवडून आले आहेत. ही आमची ताकद आहे. जानेवारी महिन्यात सर्वोच्च न्यायालयात पक्ष चिन्ह आणि नावाचा निकाल लागणे अपेक्षित आहे. तो जर संविधानाप्रमाणे लागला आणि त्यांचे नाव-चिन्ह गेले तर त्यांचे अस्तित्व राहणार नाही. शाह सेनेची निर्मितीच शिवसेनेच्या मतदारांमध्ये गोंधळ निर्माण करण्यासाठी केली. हे केले नसते तर भाजपा वाढलाच नसता. उलट भाजपा वाढलेला नसून त्यांनी बाहेरचे नगरसेवक मांडीवर घेतले आहेत, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली.

## मुंबईच्या महापौर पदावर शिवसेना दावा करणार का?

### भाजपा स्पष्ट बहुमतापासून दूर



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १७**

मुंबईसह २९ महानगरपालिकांचा निकाल लागत असताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी पत्रकार परिषद घेत निकालावर प्रतिक्रिया दिली आहे. ठाण्यात आम्हाला बहुमत मिळाले असून मागच्यावेळेपेक्षा यंदा जागांमध्ये वाढ झाली असल्याचे ते म्हणाले. ज्या ठिकाणी महायुतीतल्या पक्षांनी विरोधात निवडणूक लढवली आहे, त्या ठिकाणी आम्ही आता एकत्र येऊ, असे सुतोवाच एकनाथ शिंदे यांनी केले. तसेच शिवसेनेच्या (शिंदे) पाठिंब्याशिवाय मुंबई महापालिकेत महापौर होऊ शकत नाही, तर महापौर पदावर दावा करणार का? असा प्रश्न त्यांना विचारण्यात आला. यावरही एकनाथ शिंदे यांनी भाष्य केले.

एकनाथ शिंदे म्हणाले, मुंबई महानगरपालिकेत बहुमतासाठी लागणारी संख्या आम्ही गाठत आहोत. महायुतीलाच बहुमत मिळेल, असा आम्हाला विश्वास आहे. राज्यातील बहुसंख्या महापालिकांमध्ये महायुतीचा महापौर बसणार आहे. राज्यातील एकंदरीत वातावरण पाहिले तर महायुतीच्या बाजूने वातावरण दिसले. मुंबई महानगर क्षेत्रातील सर्वच महापालिकेत महायुतीला चांगले यश मिळाले आहे.

''२०२२ पासूनच्या महायुती सरकारच्या कार्यकाळात जी काही विकासकामे केली आहेत. त्याला मुंबईकरांनी कौल दिला. काँक्रिटचे रस्ते, सिव्हरेज प्लँट, बाळासाहेब ठाकरे दवाखाना, थांबवलेली मेट्रो, स्थगिती दिलेले कारशेड या सर्व कामांना आम्ही चालना दिली. २५ वर्ष ज्या लोकांनी महानगरपालिकेत सत्ता राबवली, त्या लोकांविरोधात मतदारांनी आम्हाला कौल दिला आहे. या निवडणुकीत भावनिक मुद्दे पुढे आणले गेले असले तरी लोकांनी विकासाला निवडले आहे'', असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

यानंतर पत्रकारांनी प्रश्न विचारला की, तुमच्या पाठिंब्याशिवाय महायुतीचा महापौर होऊ शकत नाही. तर महापौर पदावर दावा करणार का? यावर एकनाथ शिंदे म्हणाले, ''सत्ता, महापौर पद यापेक्षा आम्हाला मुंबईकरांच्या जीवनात बदल घडविण्यात आम्हाला रस आहे. मुंबईकरांना मुंबई सुंदर दिसली पाहिजे. मुंबईकर मुंबईच्या बाहेर फेकला गेला आहे. यासाठी झोपडपट्टीमुक्त मुंबई, रखडलेले एसआरए प्रकल्प पूर्ण करण्यासाठी महायुतीचा महापौर होईल.''

# काँग्रेसमध्ये शिस्तीचा दणका!

## भाई जगताप यांना 'शो-कॉज' नोटीस

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १७**

मुंबई काँग्रेसमधील अंतर्गत संघर्ष चिघळत असतानाच पक्षश्रेष्ठींनी थेट शिस्तीचा बडगा उगारला आहे. मुंबई प्रादेशिक काँग्रेस समितीच्या अध्यक्ष प्रा. वर्षा गायकवाड यांच्या राजीनाम्याची सार्वजनिक मागणी केल्याप्रकरणी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि विधान परिषदेचे सदस्य भाई जगताप यांना अखिल भारतीय काँग्रेस समितीकडून कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. या नोटीसमुळे काँग्रेसमधील अंतर्गत अस्वस्थता आता अधिकृत पातळीवर उफाळून आली असल्याचे स्पष्ट झाले आहे.

अखिल भारतीय काँग्रेस समितीचे सचिव यू. बी. वेंकटेश यांनी १७ जानेवारी २०२६ रोजी ही नोटीस बजावली आहे. नोटीसमध्ये भाई जगताप यांनी खुले माध्यम आणि सार्वजनिक व्यासपीठांवर वरिष्ठ पक्ष नेतृत्त्वाविरोधात केलेली वक्तव्ये ही पक्षशिस्तीचा भंग असल्याचे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.



संघटनात्मक बाबी, नेतृत्वावरील आक्षेप आणि अंतर्गत मतभेद हे केवळ पक्षाच्या अंतर्गत व्यासपीठांवर मांडले जावेत, माध्यमांमधून नव्हे, असा कडक इशाराही यात देण्यात आला आहे.

नोटीसमध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, अशा प्रकारची सार्वजनिक विधाने पक्षाच्या सामूहिक नेतृत्वाला कमजोर करतात, पक्षाच्या प्रतिमेला धक्का पोहोचवतात आणि ऐक्याच्या काळात गोंधळ व शिस्तभंग निर्माण करतात. त्यामुळे भाई जगताप यांना सात दिवसांच्या आत आपली भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. समाधानकारक उत्तर न दिल्यास पक्षघटनेनुसार शिस्तभंगाची कारवाई केली जाईल, असेही नोटीसमध्ये ठामपणे सांगण्यात आले आहे.

ही नोटीस महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी महासचिव रमेश चेन्निथला यांच्या वतीने देण्यात आल्याने, हायकमांडने या प्रकरणाची गंभीर दखल घेतल्याचे संकेत मिळत आहेत. मुंबईत महापालिका निवडणुकीनंतर काँग्रेसच्या कामगिरीवरून आणि संघटनात्मक नेतृत्वावरून नाराजी व्यक्त होत असताना, भाई जगताप यांनी थेट वर्षा गायकवाड यांच्या राजीनाम्याची मागणी केल्याने पक्षांतर्गत वाद उघडपणे समोर आला होता.

राजकीय वर्तुळात या कारवाईकडे 'शिस्तीचा दणका' म्हणून पाहिले जात आहे. मुंबईसारख्या महत्त्वाच्या राजकीय मैदानात काँग्रेस आधीच अडचणीत असताना, वरिष्ठ नेत्यांमधील सार्वजनिक वाद पक्षासाठी घातक ठरत असल्याची भावना दिल्ली दरबारात बळावल्याचे बोलले जात आहे.

## अटल सेतूच्या टोलमध्ये आणखी वर्षभर सवलत

**मुंबई, दि. १७**

मुंबई आणि नवी मुंबईला जोडणाऱ्या अटल बिहारी वाजपेयी शिवडी - न्हावाशेवा अटल सेतूच्या वापरासाठी आकारल्या जाणाऱ्या पथकरात ( टोल) ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय आणखी एक वर्ष कायम ठेवण्यास शनिवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. याशिवाय इलेक्ट्रीकल मोटार कार, बसेस यांनाही अटल सेतूच्या पथकरातून पूर्ण सूट देण्याचा समावेश अधिसूचनेत करण्यास मान्यता देण्यात आली. यामुळे ई-व्हेईकलसधारक तसेच अन्य वाहनधारकांना दिलासा मिळणार आहे. राज्य मंत्रिमंडळाने ४ जानेवारी २०२४ रोजीच्या बैठकीत अटल सेतूच्या वापरासाठी ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला होता. त्या निर्णयाप्रमाणे पुढे १ जानेवारी २०२६ ते ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत पथकर आकारण्यास मान्यता देण्यात आली. त्याचबरोबर इतर वाहनांसाठी एकेरी प्रवासाचा पथकर दर ही निश्चित करण्यात आले आहे.

## मुंबईत पोलिसांसाठी ४५ हजार शासकीय निवासस्थाने

### मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिपला मंजुरी

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १७**

मुंबई शहर आणि उपनगरातील पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी सुमारे ४० ते ४५ हजार शासकीय निवासस्थाने उपलब्ध व्हावीत यादृष्टीने मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्प राबविण्या शनिवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. हा प्रकल्प सार्वजनिक बांधकाम विभागाच्या महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा महामंडळाच्या माध्यमातून उभारण्यात येणार आहे. या टाऊनशिप प्रकल्पाद्वारे सुमारे पाच कोटी चौरस फूट क्षेत्राचे विकसन करण्यात येणार असून, त्यासाठी सुमारे २० हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

या टाऊनशिपसाठी लागणारा ३० टक्के निधी राज्य सरकार देणार असून उर्वरित ७० टक्के निधी एमएसआयडीसी शासन हमीद्वारे विविध वित्तीय संस्थांकडून कर्ज स्वरुपात उभारणार आहे. या प्रकल्पाचा तांत्रिक आणि आर्थिक सुसाध्यता अहवाल तयार करण्यासाठी तसेच प्रकल्प सुरु करण्यासाठी महामंडळास १०० कोटी रुपयांचा प्राथमिक निधी देण्यास आज मान्यता देण्यात आली.

मुंबईतील वाढत्या लोकसंख्येची तसेच सुरक्षेची आवश्यकता लक्षात घेऊन पोलीस दलातील अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी सुसज्ज , अद्ययावत वसाहती आणि निवासस्थानांची मोठी गरज आहे. यामुळे पोलीस दलातील अधिकारी, कर्मचारी अधिक तत्पर आणि कार्यक्षमरित्या कर्तव्य बजावू शकणार आहेत.

मुंबई पोलीस दलात ५१ हजार ३०८ इतके मनुष्यबळ आहे. पोलीस दलाकडे उपलब्ध सेवा निवासस्थाने ब्रिटीशकालीन जुन्या आणि जीर्ण इमारतींमध्ये आहेत. उपलब्ध २२ हजार ९०४ सेवा निवासस्थानांपैकी सुमारे ३ हजार ७७७ निवासस्थाने वापरासाठी अयोग्य आहेत.

## अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या मुख्यालयासाठी भूखंड

### राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १७**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या मुख्यालयासाठी पनवेल (पश्चिम) येथील भूखंड विशेष बाब म्हणून १ रुपया प्रति चौ.मी. दराने देण्यास शनिवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.

सध्या महामंडळाचे मुख्यालय छत्रपती शिवाजी महाराज स्थानकाजवळ भाडे तत्त्वावर आहे. महामंडळाला आणखी प्रभावीरित्या कामकाज करता यावे यासाठी महामंडळाच्या मुख्यालय आणि बहुउद्देशीय इमारतीसाठी पनवेल (पश्चिम) येथील सेक्टर १६ मधील सहा हजार चौरस मीटरचा भूखंड देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला.

**तिरुपती देवस्थानास नाममात्र दराने भूखंड**

तिरुमला तिरुपती देवस्थानम मंडळाला श्री. पद्मावती अम्मावरी मंदिर उभारण्यासाठी वाटप केलेला भूखंड एक रुपया प्रति चौरस मीटर दराने देण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

तिरुमला तिरुपती देवस्थानमला श्री. पद्मावती अम्मावरी मंदिर उभारण्यासाठी उलवे नोडमधील सेक्टर १२ मधील ३.६ एकरचा भूखंड वाटप करण्याचा निर्णय २९ फेब्रुवारी २०२४ रोजी घेण्यात आला आहे. त्याबाबतचा शासन निर्णयही १२ मार्च २०२४ रोजी जारी करण्यात आला आहे. यासाठी सिडको महामंडळाच्या भूमूल्य आणि भूविनियोग धोरण,२०१८ अनुसार किंमत आकारण्यात यावी, असे नमूद करण्यात आले आहे. मात्र तिरुमला तिरुपती देवस्थानम्? मंडळाने श्री. व्यंकटेश्वरा मंदिर उभारण्यासाठी वाटप करण्यात आलेल्या भूखंडाप्रमाणेच श्री. पद्मावती अम्मावरी मंदिर उभारण्यासाठीही एक रुपया प्रति चौरस मीटर दराने भूखंड वाटप करण्यात यावा आणि इतर संकीर्ण शुल्क सेवाकरासह माफ करावे, अशी विनंती सिडको महामंडळाकडे केली आहे. त्यानुसार सिडको महामंडळाने याबाबतचा ठराव करून प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी पाठवला होता.

## शहरात २० हून अधिक ठिकाणी छापेमारी

**नागपूर, दि. १७**

महानगरपालिका निवडणुका पार पडल्यानंतर अवघ्या काही तासांत नागपुरात आयकर विभागाने मोठी कारवाई केली. शनिवारी सकाळपासूनच आयकर विभागाच्या पथकांनी शहरातील २० हून अधिक ठिकाणी एकाचवेळी धाडसत्र राबविल्याने व्यापारी वर्तुळात खळबळ उडाली आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ही कारवाई मुख्यतः सुपारी व्यापाराशी संबंधित मोठ्या व्यावसायिकांवर आणि त्यांच्या निकटवर्तीयांवर करण्यात आली. सुपारी व्यापारी राजू अण्णा यांच्या शांतिनगर आणि कामठी येथील निवासस्थानी आयकर विभागाच्या पथकांनी तपास सुरू केला. तसेच कलीवाला बंधूंच्या विविध ठिकाणांवरही छापेमारी करण्यात आली. याशिवाय उमिया इंडस्ट्रीजच्या संचालकाच्या जागनाथ बुधवारी येथील निवासस्थान आणि कार्यालयातही आयकर अधिकाऱ्यांकडून कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

# महापौराच्या आधीच 'हॉटेल पॉलिटिक्स'चा धमाका!

## 'ताज'मध्ये बंदोबस्तात, तर शिंदे-अजितदादा नाराज?

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १७**

मुंबई महानगरपालिकेच्या निकालानंतर सत्तेचा खेळ संपेल, असं वाटत असतानाच महाराष्ट्राच्या राजकारणात हायव्होल्टेज ड्रामा सुरू झाला आहे. बहुमताचा आकडा हाताशी असूनही फोडाफोडीची भीती, अंतर्गत नाराजी आणि महापौरपदावरून सुरू असलेली रस्सीखेचया सगळ्यांनी मुंबईचं राजकारण तापवलं आहे. निकाल लागल्यानंतर अवघ्या काही तासांतच 'हॉटेल पॉलिटिक्स' पुन्हा एकदा केंद्रस्थानी आलं आहे.

महापौर निवडीपूर्वी कोणताही धोका पत्करायचा नाही, असा ठाम पवित्रा घेत एकनाथ शिंदे यांनी आपल्या गटातील सर्व २९ नगरसेवकांसाठी सिक्युरिटी प्लॅन आखल्याची माहिती समोर आली आहे. शिवसेना (शिंदे गट)चे सर्व नगरसेवक दुपारी तीन वाजता वांद्रे येथील ताज लँड्स एंड हॉटेलमध्ये हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. उद्देश एकचविरोधकांकडून, विशेषतः ठाकरे गटाकडून, कोणताही आमिष किंवा दबाव येऊ नये आणि नगरसेवकांची एकजूट अबाधित राहावी. महायुतीला सभागृहात बहुमत असलं, तरी प्रत्यक्ष सत्तास्थापनेपर्यंत प्रत्येक पाऊल सावधपणे टाकलं जात आहे. कारण मुंबई महापालिकेची सत्ता म्हणजे केवळ एक पद नाही, तर हजारो कोटींच्या कारभारावर नियंत्रण. त्यामुळेच महापौर निवडीपर्यंत कुठलीही गळती परवडणारी नाही, हा शिंदे गटाचा हिशोब आहे.

दरम्यान, मुंबईत सत्ता स्थापनेची घडामोडी जोरात सुरू असतानाच, शनिवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत एक वेगळाच राजकीय संदेश गेला. देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला दोन्ही उपमुख्यमंत्रीएकनाथ शिंदे आणि अजित पवारगैरहजर होते. शिंदे मुंबईत असूनही आणि अजित पवार पुण्यात असूनही बैठकीला न आल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे.

ही अनुपस्थिती केवळ योगायोग की अंतर्गत नाराजीचा इशारा, असा सवाल आता विचारला जात आहे. महापालिका निवडणुकीत अपेक्षेपेक्षा कमी जागा मिळाल्याची खंत, सत्तेच्या वाटपावरून असलेली अस्वस्थता किंवा महापौरपदावरून सुरू असलेली कुरघोडीअशा अनेक शक्यता चर्चेत आहेत. सत्तेच्या एका बाजूला 'हॉटेल पॉलिटिक्स' सुरू असताना, दुसऱ्या बाजूला सरकारमधील समन्वयावर प्रश्नचिन्ह उभं राहतं आहे.

मुंबई महापालिकेतील सध्याचं सत्तासमीकरणही तितकंच किचकट आहे. भाजप ८९ जागांसह सर्वात मोठा पक्ष ठरला आहे, शिवसेना (शिंदे) २९, शिवसेना (ठाकरे) ६५, काँग्रेस २४, मनसे ६ आणि राष्ट्रवादी (शरद पवार गट) १ जागेवर आहे. २५ वर्षांनंतर ठाकरे कुटुंबाची मुंबईवरील एकहाती सत्ता संपुष्टात आली असली, तरी ठाकरे गट अजूनही ताकदीने विरोधी बाकावर उभा आहे.

या गणितात महापौरपदाचा पेच अधिकच तीव्र झाला आहे.

## ड्रीम प्रोजेक्ट'ला धारावीचा धक्का!

**मुंबई, दि. १७**

मुंबई महानगरपालिकेत भाजपशिवसेनेची सत्ता असली, तरी धारावीकरांनी मात्र भाजपला सपशेल नाकारले, अशी स्पष्ट आणि थेट चपराक या निकालातून बसली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा 'ड्रीम प्रोजेक्ट' म्हणून गाजवलेला धारावी पुनर्विकास प्रकल्पही भाजपच्या गळ्यात हार घालू शकला नाही. खुद्द मुख्यमंत्री धारावीत येऊन रोड शो करून गेले, मोठ्या घोषणा झाल्या, विकासाची स्वप्ने रंगवली गेली; मात्र प्रत्यक्ष निकालात भाजपचा एकही उमेदवार विजयी होऊ शकला नाही.

## जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुका मतपत्रिकेवर घ्या : नाना पटोले

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १७**

देशातील अनेक राज्यांनी जनतेचा विश्वास टिकवण्यासाठी तसेच वाद टाळण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ईव्हीएम ऐवजी मतपत्रिकेवर ( बॅलेट पेपर) घेण्याचा निर्णय घेतला आहे. मग महाराष्ट्रातच ईव्हीएमचा हट्ट का आणि कोणाच्या फायद्यासाठी? असे प्रश्न मतदार विचारात आहेत. त्यामुळे या जनभावनेचा आदर करत जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका मतपत्रिकेवर घ्याव्यात, अशी मागणी काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

पटोले यांनी यासंदर्भात राज्य निवडणूक आयुक्त आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शनिवारी पत्र पाठवले आहे. राज्यात नुकत्याच



झालेल्या २९ महापालिकांच्या निवडणुकांनी निवडणूक व्यवस्थेचा बुरखा पूर्णतः फाडला आहे. शहरातील अत्यल्प मतदानाची टक्केवारी ही केवळ मतदार उदासीन नसून निवडणूक प्रक्रियेवरचा जनतेचा विश्वास कमी होत असल्याचे निर्देशक असल्याचे पटोले यांनी पत्रात म्हटले आहे.

मतदार यादीतील घोळ, मतदान केंद्र शोधण्यासाठी मतदारांना दोन-तीन तास करावी लागणारी वणवण, हजारो मतदारांना मतदान न करताच परत जाण्याची येणारी वेळ, या साऱ्या बाबी निवडणूक आयोगाच्या अकार्यक्षमतेचे गंभीर निदर्शक असून ही परिस्थिती लोकशाहीसाठी घातक आहे. अत्यंत गंभीर बाब म्हणजे पालिका निवडणुकीत व्हीव्हीपॅट प्रणालीचा वापर करण्यात आला नाही. त्यामुळे आपल्या मतदानाची खात्री करण्याचा मतदाराचा अधिकारच हिरावून घेण्यात आला. त्यात भर म्हणजे मतदारांच्या बोटाला लावलेली शाई हात धुतल्यानंतर पुसली जात होती. या साऱ्या प्रकारामुळे निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता, विश्वसार्हता आणि आयोगाची निष्पक्षता यावर गंभीर प्रश्न चिन्ह उभे राहिले आहेत, असे पटोले यांनी पत्रात नमूद केले आहे.

# पक्षांतराचा फटका! शिंदेंच्या वाटेवर गेलेले ठाकरेकालीन चेहरे मतपेटीतून नामशेष

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १७**

मुंबई महापालिका निवडणुकीच्या निकालांनी एक कटू राजकीय वास्तव ठळकपणे पुढे आणलं आहेपक्षांतराला मुंबईकरांनी मोकळा कौल दिलेला नाही. शिवसेनेत फूट पडल्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली गेलेल्या, उद्धव ठाकरे यांच्या काळात नगरसेवक म्हणून घडलेल्या अनेक जुन्या चेहऱ्यांना यंदाच्या निवडणुकीत मतपेटीतून थेट नकार मिळाला. सत्तेची ताकद, सरकारी पाठबळ आणि ''खरी शिवसेना''चा दावा असूनही अनेकांना मतदारांचा विश्वास टिकवता आला नाही, हे या निकालांनी स्पष्ट केलं आहे.

निवडणूक प्रचारात शिंदे गटाकडून ''आमच्याकडे सत्ता, आमच्याकडे विकास'' असा सूर लावण्यात आला होता. मात्र मुंबईकरांनी केवळ सत्ता पाहून मतदान न करता निष्ठा, ओळख आणि स्थानिक विश्वास यांना अधिक महत्त्व दिल्याचं चित्र या निकालातून समोर आलं आहे. विशेष म्हणजे उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली एकेकाळी निवडून आलेले आणि नंतर शिंदेंच्या गटात गेलेले अनेक माजी नगरसेवक व त्यांच्या कुटुंबीयांना पराभव स्वीकारावा लागला.

धारावी आणि मध्य मुंबईत हा फटका अधिक ठळकपणे दिसून आला. शिंदे गटाकडून लढवलेले माजी नगरसेवक समाधान सरवणकर यांना मतदारांनी बाद केलं. त्याचबरोबर त्यांच्याच कुटुंबातील प्रिया सरवणकरगुरव, ज्या शिंदे गटाच्या उमेदवार होत्या, त्यांनाही पराभव पत्करावा लागला. हे दोन्ही चेहरे शिवसेना एकसंध असताना उद्धव ठाकरे यांच्या काळात राजकारणात स्थिरावले होते; मात्र पक्षांतरानंतर मतदारांचा भावनिक धागा टिकवण्यात ते अपयशी ठरल्याचं बोललं जात आहे.

केवळ थेट पक्षांतरित चेहरेच नव्हे, तर शिंदे गटातील काही प्रभावी नेत्यांचे नातेवाईकही या निवडणुकीत पराभूत झाले. यामुळे ''सत्ता असूनही मुंबईत मतदारांची मर्जी मिळवणं सोपं नाही'' हा धडा पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे. नाव, ओळख आणि प्रशासन जवळ असलं, तरी स्थानिक स्वीकार मिळाला नाही तर विजय दूरच राहतो, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

## दिग्रस येथे घरफोडी : दागिन्यांसह रोख लंपास

**•युवाराष्ट्र दर्शन दिग्रस**

येथील अंबिका नगर मध्ये राहणारी सौ सिंधू किसन डोईफोडे वय वर्ष 50 यांच्या घराच्या दरवाजाची कडी काढून चोरट्यांनी दोन लाख रुपये रोख आणि दोन सोन्याच्या अंगठ्या असा दोन लाख 84 हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. सौ. सिंधू डोईफोडे या दुपारी साडेतीन वाजताच्या दरम्यान दाराला कडी लावून बाहेर गेल्या असताना अज्ञात आरोपींनी ती कडी उघडली आणि स्वयंपाक खोलीतील डब्यामधील ठेवलेले रोख दोन लाख रुपये आणि सोन्याच्या दहा ग्रॅम च्या अंगठ्या चोरून नेल्या सध्या दहा ग्रॅमच्या सोन्याची किंमत एक लाख 43 हजार रुपये एवढी असून संपूर्ण मुद्देमाल तीन लाख 43 हजार रुपयांचा चोरी केल्याचे सांगण्यात आले याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.

युवाराष्ट्र दर्शन
-: कार्यालयीन पत्ता :-
गुरुमाऊली सोसायटी, दाते कॉलेज रोड, जुना उमरसरा, यवतमाळ ४४५००१
-: जिल्हा प्रतिनिधी :-
संजय सावरकर मो. ९४२१८४४८७०
* एजन्सीसाठी संपर्क
ई-मेल ssawarkar43@gmail.com

## संक्षिप्त

### मोटर पंपची चोरी

**•युवाराष्ट्र दर्शन आर्णी**

आर्णी तालुक्यात येणाऱ्या डेहनी येथील गजानन लक्ष्मण मसाटवार यांचे डेहणी शिवारात शेत असून या शेतात त्यांनी विहिरीला लावलेला मोटर पंप अज्ञात चोरट्याने चोरून नेला एकूण नऊ हजार रुपये त्याची किंमत असल्याचे त्यांनी आपल्या तक्रारीत नमूद केली आहे ही चोरी काल रात्रीच्या दरम्यान झाली. तर दुसरी चोरी उमरखेड पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या खरूस बुद्रुक येथील किसन धोंडबाराव वानखेडे यांच्या खरूस येथील शेत शिवारात झाली आहे त्यांनी पैनगंगा नदीच्या पात्रात सिंचनासाठी मोटर पंप लावला होता चोरट्यांनी तो रात्रीच्या दरम्यान लंपास केला अशी तक्रार त्यांनी पोलीस स्टेशनला दिली.

# विवाह मेळावे काळाची गरज

## अध्यक्ष महेश ढोले यांचे मनोगत : परिचय मेळाव्याच्या माध्यमातून समाजाला अनेक लाभ

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १७**

तेली समाज विवाह व सांस्कृतिक मंडळाव्दारे आयोजित ३८ वा उपवर-वधू परिचय मेळावा १८ जानेवारी २०२६ रोजी आयोजीत केला आहे. आपल्या विदर्भामध्य बऱ्याच शहरामध्ये उपवर-वधू परिचय मेळाव्याचे आयोजन केले जातात, बऱ्याच ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाद विवाद आहेत परंतु तेली समाज विवाह व सांस्कृतिक मंडळ, यवतमाळ ही एकमेव अशी संस्था आहे की, जिथे वाद-विवाद आढळून येत नाही. संपूर्ण संचालक मंडळ एक जुटीने कार्य करीत आहे. त्याबद्दल संपूर्ण समाजाचा व संचालक मंडळाचा ऋणी आहे. या निमित्त उपवर मुला-मुलींचा 'शुभ मंगलम् परिचय पुस्तिका' प्रकाशित करतांना अतिशय आनंद आहे, परिचय मेळावे काळाची गरज असून त्यातून समाजाला अनेक लाभ मिळतात असे मनोगत तेली समाज विवाह व सांस्कृतीक मंडळाचे अध्यक्ष महेश ढोले यांनी व्यक्त केले.





**परिचय मेळाव्याचे फायदे -**

१) समाज संघटीत होत आहे पुर्वीला समाजाचे मोठ मोठे आंदोलने होत होती, परंतु मागील काही काळापासून ही आंदोलने लुप्त झाले परंतु परिचय मेळाव्याच्या माध्यमातून समाजाचे एकत्रिकरण होत आहे व त्यामुळे समाज संघटीत होत आहे.

२) सर्व शाखा एकत्र येत आहेत पूर्वीला समाज आपल्या शाखेतच विवाह जुळवित होते. परंतु परिचय मेळाव्याच्या माध्यमातून इतर शाखामध्ये रोटी-बेटी चे व्यवहार मोठ्या प्रमाणात होत आहेत.

३) जुन्या चालीरीती बदलत आहेत पुर्वीला हुंडा पध्दत होती. देवाण-घेवाण होत होती परंतु बदलत्या काळामध्ये मेळाव्याच्या माध्यमातून याला विरोध झाला. कालांतराने ही पध्दत जवळपास बंद झाली तसेच पुर्विला उपवरालाच प्रथम आमंत्रण देण्याची पध्दत होती. आता तसे राहिले नसून वर पक्ष सुध्दा वधू पक्षांना आमंत्रण देतांना दिसून येतात. अशा अनेक चालिरीती गरजेनुसार बदलत आहेत.

४) वेळेची आणि पैशाची बचत होती मेळाव्याच्या माध्यमातून सर्व उपवर मुला मुलींकडील मंडळी एकत्र येत असल्यामुळे वेळेची व पैश्याची बचत होते

५) भेट संवाद थेट संवाद या माध्यमातून उपवधू-वर व पालकांना प्रत्यक्ष एकमेकांना भेटता येते त्यामुळे थेट संवाद करता येतो.

६) माहिती पत्रक- माहिती पत्रकामुळे उपवधू-वरांना व पालकांना बरीच माहिती तात्काळ मिळते.

७) योग्य निर्णय घेणे - या प्रसंगी उपवधू-वर परिचय पुस्तिकेच्या माध्यमातून समाजामध्ये किती मुले व मुली लग्नाचे आहे ते कळते व त्यातून आपल्या सोईच्या योग्य अशा उपवधू-वर यांची निवड करतांना योग्य निर्णय घेता येतो.

८) परिचय मेळावा ही काळाची गरज- विवाह जुळविणे हा परिचय मेळाव्याचा उद्देश असल्यामुळे व समाज संघटीत करण्याचा हा उद्देश असल्यामुळे परिचय मेळावा ही काळाची गरज आहे. थोडक्यात वधू-वर परिचय मेळावा हा आधुनिक काळातील कार्यक्षम आणि सोईस्कर विवाह जोडण्याचा मार्ग आहे.

मी मंडळाच्या वतीने सर्व समाज बांधवांना विनंती करतो की, त्यांनी या भव्य मेळाव्याचा व 'शुभ मंगलम्' या परिचय पुस्तिकेचा लाभ घ्यावा, समाज संघटन कार्यास सहृदय सहकार्य करावे. या मेळाव्याकरिता समाज बांधवानी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष यामध्ये माहितीपत्रक, देणगी, जाहीरात या व्दारे सहकार्य केले तसेच सहभाग घेतला त्याबद्दल मी मंडळाच्या वतीने मनःपूर्वक आभारी आहे. भविष्यात अशाच सहकार्याची अपेक्षा करतो.

# सेवानिवृत्त न.प. कर्मचारी संघटना गठीत



**•युवाराष्ट्र दर्शन वणी /**

मकर संक्रांतीच्या शुभ मुहूर्तावर दिनांक 14 जानेवारी 2026 रोजी वणी नगर नगरपरिषदेच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची सभा तराळे माजी अभियंता (जलपुर्ती/नियोजन) नगर परिषद वणी यांचे निवासस्थानी घेण्यात आली. सभेत सेवानिवृत्त नगरपरिषद कर्मचारी संघटना गठीत करण्यात आली. संघटनेचे अध्यक्ष म्हणून नरेंद्र तराळे यांची सर्वांनुमते निवड करण्यात आली. तर उपाध्यक्षपदी खुशाल भोंगळे माजी कर अधिक्षक, सचिव पदी राजेंद्र जयस्वाल, कोषाध्यक्षपदी अनिल कांबळे माजी लेखापाल,, सहसचिव पदी संजय दखणे तर इतर सदस्य म्हणून तुळशीराम गाताडे, मोहन नायगावकर, केशव खापणे, मुरलीधर कुत्तरमारे, दिगंबर देशमुख, आबा सालकाडे, साधना रामगिरवार यांची निवड करण्यात आली.

नरेंद्र तराळे हे वणी नगरपरिषदेत जलपूर्ती, नियोजन व विकास विभाग अभियंता म्हणून कार्यरत होते. ते अत्यंत अनुभवी, अभ्यासू व दूरदृष्टी असलेले व्यक्तिमत्त्व असून त्यांच्या नेतृत्वाखाली ही संघटना निश्चितच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांवर प्रभावीपणे संघर्ष उभा करून न्याय मिळवून देईल, असा विश्वास सभेत व्यक्त करण्यात आला. त्यांच्या प्रशासकीय अनुभवाचा लाभसंघटनेला निश्चितच होईल, असेही मत यावेळी मांडण्यात आले. सभेचे संचालन अनिल कांबळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन खुशाल भोंगळे यांनी केले.

# रेती तस्करावर गुन्हा दाखल!

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, घाटंजी, दि. १७ जानेवारी**

घाटंजी तालुक्यातील पारवा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या सायफळ पैनगंगा नदीपात्रातून दिवसरात्र रेतीची तस्करी सुरू असून मोठ्या प्रमाणात रेती तस्करीला उधाण आले आहे. सायफळ येथील अट्टल रेती तस्कर हा ईतर गावातील रेती तस्करांना हाताशी धरून पैनगंगा नदीपात्रातून दिवसाढवळ्या बेसुमार रेतीचा उपसा करून लगतच्या तालुक्यातील गावात तस्करी करीत असतो यातून भरगच्च पैसा कमवतो मात्र अवैध उत्खननमूळे शासनाचे लाखोचे महसूल नूकसान होते.

अशातच ग्राम महसूल अधिकारी चिखलवर्धा ताडसावळी यांनी सायफळ नदीपात्रात धाड टाकली असता एक विना नंबर चा महिंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर रेती भरून आढळून आला आहे. सदर ट्रॅक्टर तहसील कार्यालयात घेऊन जाण्यास ट्रॅक्टर मालक नकार देऊन ग्राम महसूल अधिकारी कुळसंगे यांच्या सोबत हूज्जत घालून ट्रॅक्टर पळवून नेल्याचे कळते. या प्रकरणी ग्राम महसूल अधिकारी चिखलवर्धा यांनी पारवा पोलीसात शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी पारवा पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दिली असून यावरून ट्रॅक्टर मालक व अज्ञात ट्रॅक्टर चालक विरूध्द कलम ३०३ (२)१३२ ३(५)४८(७)४८(८) या नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रेती तस्करी चा खेळ दिवसा ढवळ्या राजरोसपणे सुरु असून कुणाच्या वरदहस्ताने व आशिर्वादाने त्यांची हींमत वाढीस लागत आहे ? हे समजण्या पलिकडचे कोड़े आहे.

यात तस्करांची मजल कर्मचा-यांवर हल्ले करण्याच्या घटनेत वाढ होत असून रेती तस्करावर कडक कारवाई होत नसल्याने रेती तस्कर कर्मचा-यांवर हल्ले करण्यास हिम्मत वाढत चालली असल्याचे दिसून येते. यामुळे अशा रेती तस्करावर कडक कारवाई करावी अशी मागणी जनतेकडून होत आहे.

# २०० वर्षांनंतर वैदिक परंपरेचा सुवर्ण अध्याय

**•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ :**

प्राचीन वैदिक परंपरेचा गौरव वाढवणारा आणि तब्बल २०० वर्षांनंतर इतिहास घडवणारा अद्वितीय क्षण देशाने अनुभवला आहे. वैदिक संस्कृतीची पताका पुन्हा एकदा अभिमानाने फडकवणाऱ्या



या ऐतिहासिक कार्याबद्दल शंकराचार्यांसह अनेक धार्मिक संत-महंतांनी मुक्तकंठाने कौतुक व अभिनंदन केले आहे. या ऐतिहासिक परंपरेचे शिल्पकार, अद्भुत पराक्रम आणि वैदिक तेजाने देशाला प्रेरणा देणारे दंडक्रम विक्रमादित्य वेदमूर्ती देवव्रत रेखे यांचा भव्य गौरव सत्कार समारंभ यवतमाळ येथे आयोजित करण्यात आला आहे. हा ऐतिहासिक गौरव सोहळा दि. ४ फेब्रुवारी २०२६ रोजी संपन्न होणार आहे. या गौरवमय क्षणाचा साक्षीदार होण्यासाठी नागरिक, वैदिक परंपरेचे अभ्यासक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# बिटरगाव ठाणेदारांनी चढवली वली कामिल बादशाह मियाँ दर्गा येथे चादर

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी :-ढाणकी, दि. १७**

उमरखेड तालुक्यातील निंगनुर येथील विदर्भ - मराठवाड्यातील हिंदु मुस्लिम एकतेचे प्रतिक असलेल्या वली कामील बादशाह मियाँ संस्थान येथील उर्स यात्रेनिमित्त दररोज हजारो भाविकांच्या अक्षरशः रांगा लागत आहे . बिटरगाव ठाणेदार पांडूरंग शिंदे यांनी ताफ्यासह भेट देऊन वली कामील बादशाह मियाँ चरणी श्रद्धापुर्वक चादर चढविली .



दरवर्षी १५ दिवस चालणाऱ्या ऊर्स यात्रेसाठी बाहेरगावाहून येणाऱ्या भाविकांना विशेषतः महिला भगिनींना त्रास होऊ नये , यात्रेत अवैध धंदे तसेच अनुचित प्रकार घडू नये यासाठी ठाणेदार पांडुरंग शिंदे यांनी आपल्या ताफ्यासह यात्रेत फेरफटका मारला .यावेळी बीट जमादार रवि गीते, सतिश परतके , इम्रान शेख, हिम्मत जाधव व गावातील नागरिक उपस्थित होते .

# जि. प. उच्च प्राथमिक शाळा अकोली खु. येथे विविध उपक्रम

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १७ जानेवारी**

दिनांक 15 जानेवारी रोजी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा अकोली खुर्द येथे विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मुरलीधर भिडकर प्रमुख अतिथी तंटामुक्ती समिती अध्यक्ष नामदेवराव वानखडे हे उपस्थित होते.

कार्यक्रम प्रसंगी जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्था 109 च्या संचालक विजया राऊत (मलकापूरे) यांनी शाळेला डायस भेट दिले. आरोग्य सेविका राऊत यांनी विद्यार्थ्यांना चांगल्या आरोग्याच्या सवयी व स्वच्छतेचे महत्व याविषयी सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना जिवंत साप



दाखवून विषारी व बिनविषारी साप, सजीवांच्या अन्नसाखळी मध्ये सापाचे स्थान, शेतकऱ्यांचा मित्र म्हणून सापाची गरज तसेच साप चावल्यानंतर करावयाचे प्राथमिक उपचार याविषयी मार्गदर्शन सर्पमित्र अनिकेत कोहचाडे, सुमित डंभारे, स्वप्निल शस्त्रकार, गजानन मडावी यांनी केले. जिल्हा परिषद शाळा अकोली येथे सातत्याने विविध कार्यक्रम व उपक्रमांची आयोजन करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक सतत प्रयत्नशील असतात याकरिता शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मुरलीधर भिडकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून शिक्षकांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांचा सर्वांगी विकास करण्याच्या दृष्टीने शिक्षणासोबतच सहशालेय उपक्रमांची सांगड असणे महत्त्वाचे असते असे विचार अध्यक्ष मुरलीधर भिडकर यांनी व्यक्त केले. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमा अंतर्गत जवळजवळ सर्व निकष शाळेने पूर्ण केले असल्याचे काकडे यांनी उपस्थितना सांगितले.

शाळेला दिलेल्या भेटीबद्दल कृतज्ञता म्हणून विजया राऊत (मलकापूरे) यांचे शाल श्रीफळ देऊन स्वागत सत्कार करण्यात आला. सर्पमित्र अनिकेत कोहचाडे, सुमित डंभारे, स्वप्निल शास्त्रकार, गजानन मडावी यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अविनाश काकडे यांनी तर आभार सुचिता बोंद्रे यांनी व्यक्त केले.

शाळेचे मुख्याध्यापक अशोक तालकोकुलवार, अविनाश काकडे, सुरेश वाकडे, सुचिता बोंद्रे, विजय मलकापूरे, सोमेश्वर पौनीकर हे उपस्थित होते.

# शिक्षकांनी मिथके तपासून विद्यार्थ्यांना सांगावी

## स्नेहा टोम्पे यांचे प्रतिपादन

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १७ जानेवारी**

शिक्षकांनी अध्यापन करतांना अभ्यासक्रमानुसार विषयात आलेली मिथके तथ्य पडताळून सदसदबुद्धीने विद्यार्थ्यांना सांगावी. असे आवाहन मिथक व लोक संस्कृतीच्या अभ्यासक स्नेहा टोम्पे यांनी केले. त्या जिजाऊ शिक्षण महाविद्यालयात आयोजित राजमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती निमित्य आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश नागदेवते हे होते. प्रमुख वक्ते म्हणून जिजाऊ शिक्षण समितीचे अध्यक्ष प्रा. दिनकरराव वानखडे, स्नेहा टोम्पे हे उपस्थित होते. राजमाता जिजाऊ ह्या दोन छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी महाराज तसेच पती शहाजी महाराज यांच्या दरम्यानच्या त्या सेतू होत्या.जिजाबाई मध्ये संस्कृती आंतर प्रवाही होती. त्यामुळे त्या शिवबांना घडवू शकल्या असेही स्नेहा टोम्पे यांनी सांगितले. प्रा. दिनकर वानखडे यांनी स्वामी विवेकानंद यांनी तेंव्हा प्लेगच्या साथीत ईश्वर पूजेपेक्षा लोकसेवेला जास्त महत्व दिल्याचे सांगितले. यावेळी बी.एड्. प्रथम वर्षच्या विद्यार्थ्यांनी जिजाऊ वंदना गात जिजाऊला अभिवादन केले. हिना खान हिने स्वामी विवेकानंद यांच्या




जीवनकार्यावर प्रकाश टाकला.तर अपूर्वा खांडेकर हिने जिजाऊच्या वेशभूषेत एकपात्री सादर केले. प्रा.नीलेश भगत यांच्या मार्गदर्शना खाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.. संचालन काजल जाधव हिने केले. परिचय काजल धुर्वे हिने करून दिला.प्रास्ताविक वैभवी गोंदे हिने केले. आभार वैष्णवी अतकरी हिने मानले. कार्यक्रमाला माजी प्राचार्य सुनील कावळे, प्रा.योगेश निमजे,प्रा मनीषा मुलकुलवार, प्रा सुरेंद्र राऊत.ग्रंथपाल वृषाली काळे व कर्मचा-यांसह बी.एड्. द्वितीय वर्षाचे विद्यार्थी उपस्थित होते.

# तुपटाकळी येथे वेशभूषा स्पर्धा उत्साहात संपन्न

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, दिग्रस, दि. १७ जानेवारी**

तालुक्यातील तुपटाकळी येथील डॉ. अच्युत दुलाप्पा अत्तेवार हायस्कूल येथे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी व सांस्कृतिक जाणीव वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने व राजमाता जिजाऊ तसेच स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचे औचित्य साधून वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अतिथीचा मान विद्यार्थी मंडळाच्या प्रतिनिधी कु. संस्कृती कवटकर , कु. संस्कृती डोंगरे, कु. श्रुती ढोरे यांना देण्यात आला त्यांच्या हस्ते स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले .या स्पर्धेचे उद्घाटन शाळेचे मुख्याध्यापक डॉ. मंगेश अंबरकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वर्ग 9 ब ची विद्यार्थिनी कु. प्रियंका जाधव हिने इंग्रजी भाषेतून अतिशय प्रभावीपणे केले. स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ यांचे चित्र फलकावर कलाशिक्षक सुजित ठाकरे यांनी अतिशय सुंदर रेखाटले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून ज्येष्ठ क्रीडा शिक्षक गजानन इंगळे तसेच विज्ञान शिक्षक आनंद शर्मा यांनी जबाबदारी पार पाडली. विद्यार्थ्यांनी विविध ऐतिहासिक, सामाजिक, वैज्ञानिक व देशभक्तीपर वेशभूषा सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या स्पर्धेत वर्ग पाच ते दहाच्या जवळपास चाळीस विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला त्यांच्या अभिनयातून आत्मविश्वास, अभिव्यक्ती व सर्जनशीलता स्पष्टपणे दिसून आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ईश्वरी गावंडे व श्रद्धा चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन व अंमलबजावणी प्रभारी प्रमुख शिक्षिका सुनीता जाधव व अनुराधा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. स्पर्धेच्या शेवटी परीक्षकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढीस लागला असून



शाळेतील शिक्षक व पालकांनी समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# पोदार शाळेतील विद्यार्थ्यांचा सामाजिक उपक्रम

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी पुसद, दि. १७ जानेवारी**

विद्यालंकार्स पोदार लर्न स्कूल पुसद येथील विद्यार्थ्यांनी सामाजिक जाणिवेचे भान राखत एका अनाथाश्रमाला तसेच वृद्धाश्रमाला धान्य भेट दिली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी समाजातील गरजू घटकांप्रती सहानुभूती व मदतीची भावना व्यक्त केली. विद्यालंकार्स पोदार लर्न स्कूल (VPLS) हे दृढपणे मानते की शिक्षण केवळ शैक्षणिक प्रगतीपुरते मर्यादित नसून सामाजिकदृष्ट्या जबाबदार व करुणामय व्यक्तिमत्त्व घडविण्यात त्याची महत्त्वपूर्ण भूमिका असते. या दृष्टीकोनातून शाळेत इयत्ता पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी "वन फिस्ट ग्रेन" या नावाने सामाजिक उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी आपल्या



आवडीप्रमाणे व क्षमतेनुसार धान्य आणले. अगदी छोटासा वाटणारा प्रत्येक सहभाग एकत्र आल्यास मोठा बदल घडवू शकतो, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. या उपक्रमाला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. त्यांनी आपल्या पाल्यांना सहानुभूती व उदारतेने सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले. पोदार स्कूल मधील शिक्षकांनीही आदर्श निर्माण करत आवश्यक वस्तूंचे दान केले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये करुणा, दातृत्व आणि सामाजिक जबाबदारीचे मूल्य अधिक दृढ झाले. १७ जानेवारी रोजी संकलित साहित्याचे वितरण चंदू नाईक ज्येष्ठ नागरिक गृह (वृद्धाश्रम), , पुसद येथे करण्यात आले. त्यानंतर स्वर्गीय विद्यरत्न वडते बालगृह (अनाथालय) येथे भेट देण्यात आली. या उपक्रमाचे नेतृत्व पोदार स्कूल च्या वरिष्ठ व कनिष्ठ विद्यार्थी परिषदेच्या सदस्यांनी तसेच वर्ग प्रतिनिधींनी केले. त्यांनी आपल्या वर्गांचे प्रतिनिधित्व अभिमान व जबाबदारीने केले. या वेळी उपप्राचार्य व शिक्षक उपस्थित होते.

युवाराष्ट्र दर्शन
# गोंदिया जिल्हा
रविवार, १८ जानेवारी २०२६

**वार्ताहर व एजेंसी नियुक्ती करणे आहे**
मराठी लोकप्रिय दै. युवाराष्ट्र दर्शन करिता गोंदिया जिल्ह्यातील आमगाव, सालेकसा, देवरी, सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव, तिरोडा, गोंदिया क्षेत्रात वर्तमान पेपरच्या एजेंसी व वार्ताहर करिता संपर्क साधा मो. ९५१८९३४०९६
**युवाराष्ट्र दर्शन, गोंदिया जिल्हा कार्यालय**
जिल्हा प्रतिनिधी मुकेश कुमार मिश्रा, कार्यालय पत्ता मनोहर चौक, गोविंदपूर रोड बग्गा कॉम्प्लेक्सच्या जवळ गोंदिया, ता. जि. गोंदिया बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क करा मो./व्हॉटअप नं. ९१७५२८३७४०

## सरस्वती ज्ञानदीप कॉन्व्हेंट येथे पतंग महोत्सव साजरा



अर्जुनी/मोरगाव : श्रीमती केशरबाई शिक्षण संस्थाद्वारा संचालित सरस्वती ज्ञानदीप कॉन्व्हेंट येथे मकर संक्रांतीनिमित्त वर्ग नर्सरी ते यू के जी मधील विद्यार्थ्यांसाठी पतंग महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शाळेच्या प्राचार्या शौव्या जैन, समन्वयक भगीरथ गांधी, क्रीडाशिक्षक महेश पालीवाल, पर्यवेक्षिका वंदना शेंडे उपस्थित होते. तिळगूळ घ्या, गोड गोड बोला' अशा शुभेच्छांचा वर्षाव करत शनिवारी शाळेमध्ये मकरसंक्रांतीचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने शाळेमध्ये पतंग उत्सव रंगला होता. आकाशात झेपावणाऱ्या रंगीबेरंगी पतंगांमुळे सर्व विद्यार्थी आनंदाने अक्षरशः न्हाऊन निघाले होते. यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# अखेर नरभक्षक बिबट्या जेरबंद

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

तिरोडा : तालुक्यातील खडकी (डोंगरगाव) परिसरात ९ जानेवारी रोजी घडलेल्या दुःखद घटनेनंतर नरभक्षक बिबट्याची दहशत पसरली होती.खडकी, डोंगरगाव, निमगाव, बुचाटोला आणि रुस्तमपूर ही गावे घनदाट जंगलांनी वेढलेली असल्याने बिबट व वाघाच्या भितीने पालकांनी मुलांना शाळेत पाठविणे बंद केले होते.तसेच शेतकरीही शेतपरिसरात जायला घाबरायचे,त्यामुळे वनविभागाने बिबट्याला पकडण्याकरीता ४ विविध ठिकाणी पिंजरे लावले होते.यापैकी खडकी परिसरातील तलावाशेजारी पिंजर्यात बिबट्याला आज १७ जानेवारीला सायकांळच्या सुमारास जेरबंद करण्यात वनविभागाला यश आले आहे.

आज पहाटे डोंगरगाव येथील परमानंद भगत यांच्या घराच्या अंगणात शिरून या बिबट्याने बैलावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. या घटनेनंतर परिसरात मोठा तणाव निर्माण झाला होता. शाळेत तळ ठोकून असलेल्या वनविभागाच्या पथकाने तातडीने बिबट्याचा मागोवा घेण्यास सुरुवात केली. बिबट्या खडकी डोंगरगाव शिवारात असल्याचे लक्षात येताच, वनविभागाच्या तज्ज्ञ नेमबाजांनी त्याला बेशुद्धीचे इंजेक्शन मारले. इंजेक्शन लागल्यानंतर काही वेळातच बिबट्या शांत झाला आणि त्याला सुरक्षितपणे ताब्यात घेण्यात आले.



## अदानी फाउंडेशनतर्फे तिरोडा तालुक्यातील १० गावांत महाआरोग्य शिबिर

### २७४४ रुग्णांनी घेतला लाभ



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

गोंदिया : अदानी फाउंडेशनच्या वतीने सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून तिरोडा तालुक्यातील विविध ग्रामीण भागांत मोफत कॅन्सर तपासणी आणि मल्टी स्पेशालिटी आरोग्य निदान व उपचार शिबिरांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत एकूण १० भव्य शिबिरांच्या माध्यमातून २,७४४ रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी करून त्यांना औषधोपचार पुरविण्यात आले.

अदानी पॉवरचे प्रमुख मयंक दोशी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अदानी फाउंडेशनचे प्रमुख बिमूल पटेल यांच्या नेतृत्वात हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या घरापर्यंत तज्ञ आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, हा या शिबिरांचा मुख्य उद्देश होता. यानुरूप तालुक्यातील बिर्सी, मरारटोला, पालडोंगरी, मलपुरी, खडकी, खमारी, कवलेवाडा, खैरबोडी, बेर्डीपार आणि गराडा या गावांमध्ये आरोग्य अभियान राबविण्यात आले.

सदर शिबिरामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी रिजनल कॅन्सर हॉस्पिटल नागपूर व सहयोग हॉस्पिटल गोंदिया येथील तज्ञ डॉक्टरांची उपस्थिती होती. यात प्रामुख्याने कर्करोग तपासणी: मुख कर्करोग, स्तन कर्करोग, गर्भाशय कर्करोग व इतर कर्करोगांचे तज्ञांकडून विशेष निदान करण्यात आले. शिबिरात सामान्य रोग विशेषज्ञ, बालरोग विशेषज्ञ, नेत्ररोग विशेषज्ञ, अस्थिरोग विशेषज्ञ आणि स्त्रीरोग तज्ञांनी रुग्णांची सखोल तपासणी केली. यानंतर रूग्णांना आवश्यक औषधोपचारही मोफत उपलब्ध करून देण्यात आले. अदानी फाउंडेशनच्या या उपक्रमामुळे दुर्गम भागातील रुग्णांना मोठ्या शहरात न जाता दर्जेदार आरोग्य सेवा मिळाली आहे. आरोग्याप्रति जनजागृती आणि वेळीच निदान झाल्यामुळे अनेक गंभीर आजारांवर नियंत्रण मिळवणे शक्य होईल, असा विश्वास अदानी समूहातर्फे व्यक्त करण्यात आला आहे.

## राज्यमंत्री डॉ. भोयर यांची पोलीस अधीक्षक कार्यालयाला भेट



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

गोंदिया : राज्याचे गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार, खनिकर्म विभागाचे राज्यमंत्री जिल्ह्याच्या दौऱ्यावर असतांना त्यांनी गोंदिया येथे पोलीस अधीक्षक कार्यालयाला भेट देवून पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांच्याकडून जिल्ह्यातील शांतता व सुरक्षीतता बाबत आढावा घेतला. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष लायकराम भेंडारकर, आमदार विनोद अग्रवाल, पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

राज्यमंत्री भोयर म्हणाले, जिल्ह्यातील सालेकसा तालुक्यातील आदिवासी बांधवांचे श्रध्दास्थान असलेल्या कचारगड येथे १९८६ पासून यात्रा भरते. कचारगड येथील पारी कोपार लिंगो माँ काली कंकालीच्या यात्रेला येत्या ३० जानेवारीपासून सुरुवात होत आहे. ही यात्रा पाच दिवस चालणार असून विविध राज्यातून आदिवासी बांधव या यात्रेत सहभागी होणार आहेत. यात्रेदरम्यान येणाऱ्या भाविकांना कोणतीही अडचण निर्माण होणार नाही यासाठी पोलीस प्रशासनाने कोणाच्याही भावना दुखावल्या जाणार नाही याची दक्षता घ्यावी. यात्रेदरम्यान भाविकांसाठी पिण्याचा पाण्याची व्यवस्था, टॉयलेटची व्यवस्था, हिरकणी कक्ष स्थापन करण्यात यावा असेही त्यांनी यावेळी सांगितले. पोलीस अधीक्षक भामरे म्हणाले, कचारगड यात्रेदरम्यान सी-६० चे तीन पथक राहणार आहेत. अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, उपअधीक्षक आमगाव प्रमोद मडामे, उपअधीक्षक देवरी विवेक पाटील यांच्या मार्गदर्शनात जवळपास ३०० अंमलदार यात्रेदरम्यान बंदोबस्तात उपस्थित राहणार आहेत असे त्यांनी सांगितले.

### दुचाकी लंपास

गोंदिया : शहर पोलिस ठाण्यांतर्गत काका चौक येथे अज्ञात चोरट्याने दुचाकी लंपास केली. ही घटना १५ जानेवारी रोजी उघडकीस आली. फिर्यादी संविधान बाबुराव राऊत यांची दुचाकी क्र. एमएच. ३७/एएल. ७१७३ काका चौक येथे ठेवली असता, अज्ञात चोरट्याने डाव साधून लंपास केली. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

## विधी सेवा महाशिबिर व शासकीय योजनांच्या महामेळावा १८ रोजी

### विविध विभागांकडून नागरिकांना दिली जाणारी माहिती

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

गोंदिया : डॉ.बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय सांस्कृतिक सभागृह, मरारटोली येथे १८ जानेवारी रोजी आयोजित विधी सेवा महाशिबिर व शासकीय योजनांच्या महामेळाव्यात जिल्ह्यातील नागरिक लाभान्वित होणार आहेत. सदर महाशिबिर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण जिल्हा न्यायालय व जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेले आहे.

या विधी सेवा महा शिबिरात महसूल विभाग, आरोग्य विभाग, पोलीस विभाग, परिवहन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, दिव्यांग विभाग, पुरवठा विभाग, समाज कल्याण विभाग, महावितरण विभाग, महिला व बालकल्याण, प्रादेशिक वनविभाग, अन्न व औषध प्रशासन, जिल्हा उपनिबंधक, आदिवासी विभाग, कामगार विभाग, पणन विभाग, उमेद, यांच्यासह अन्य विभागाचे दालन येथे असणार आहेत. महसूल विभागाकडून जमिनीबाबत आवश्यक कागदपत्रांची माहिती दिली जाईल. यासह विविध दाखल्यांचे अद्यावतीकरण, सातबारा विषयी माहिती मिळेल. आरोग्य विभागाकडून लावण्यात येणाऱ्या दालनामध्ये विविध असंसर्गजन्य रोगांची तपासणी केली जाईल. यासह तंबाखू विरोधी विषयी माहिती दिली जाईल. यासह ज्यांना भविष्यात अवयव दान करायचे असल्यास त्यांना अर्ज देण्यात येईल. पोलीस विभागाकडून लावण्यात येणाऱ्या दालनांमध्ये दामिनी पथक, नक्षलग्रस्त भागांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती आणि अन्य कलमांची माहितीही देण्यात येईल. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून बांधकामा संदर्भातील उपयोगिता प्रमाणपत्र घेणे आवश्यक असल्याची महत्त्वपूर्ण माहिती दिली जाईल, तर दिव्यांग विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहितीही या ठिकाणी देण्यात येईल. पुरवठा विभागाकडून रेशन कार्डसाठीचे अर्ज स्वीकारले जातील, गॅस सिलेंडरची नवीन जोडणीसाठीचा अर्ज येथे करता येईल. अन्न व औषध प्रशासन विभागाकडून स्वच्छता तसेच वजनमापे बाबत माहिती दिली जाईल. कौशल्य विकास विभागाकडून विविध कौशल्य अभ्यासक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने वन स्टॉप सेंटर, अनाथ बालकांना कुटुंबात समाविष्ट करून त्यांना कौटुंबिक वातावरण देण्यासाठी शासनाने केलेल्या प्रयत्नांची माहितीही या ठिकाणी मिळणार आहे. यासह जिल्हा उपनिबंधक, शिक्षण विभाग, जिल्हा पणन अशा महत्त्वपूर्ण विभागांचे दालन या ठिकाणी असून नागरिकांना थेट माहिती विचारून लाभ घेता येईल. जिल्ह्यातील नागरिकांच्यासाठी होणाऱ्या या विधी सेवा महा शिबिर व शासकीय योजनांच्या महामेळाव्यात नागरिकांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवून नागरिकांसाठी असणाऱ्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन विधी विभाग व जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आलेले आहे.

## योजनांचा लाभ नागरिकांना मिळावा : खासदार डॉ.प्रशांत पडोळे



गोंदिया : स्थानिक स्वराज्य संस्था आटोपल्यानंतर प्रशासकीय यंत्रणाही आता कामाला लागली आहे. अशातच १६ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीची सभा खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. या सभेत अनेक महत्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. तसेच प्रलंबित समस्या तातडिने मार्गा लावण्याचे निर्देश खा. पडोळे यांनी प्रशासकीय यंत्रणेला दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा नियंत्रण व दक्षता समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रामुख्याने उपस्थित होतो. बैठकीदरम्यान जिल्ह्यातील विविध प्रशासकीय, सामाजिक तसेच सार्वजनिक हिताशी संबंधित समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणी, योजनांच्या अंमलबजावणीतील अडथळे, तसेच प्रलंबित प्रश्न याबाबत अधिकाऱ्यांनी माहिती सादर केली. समितीच्या सदस्यांनी आपापल्या सूचना व मत मांडत समस्यांवर प्रभावी उपाययोजना सुचवल्या. या सर्व समस्यांचा सखोल आढावा घेत संबंधित विभागांना त्या लवकरात लवकर सोडवण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या. तसेच योजनांची प्रभावी अंमलबजावणी, पारदर्शकता व वेळेवर काम पूर्ण करण्यावर विशेष भर देण्यात आला. या बैठकीमुळे प्रशासन आणि नागरिकांमधील समन्वय अधिक मजबूत होऊन जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याचेही निर्देश देण्यात आले. या आढावा बैठकीत जि.प. अध्यक्ष लायकराम भेंडारकर, माजी आमदार दिलीप बंसोड यासह लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

## ग्रामीण रोजगार हमी योजनेमधून गोंदियात जल सिंचन प्रकल्प

### जल सिंचन प्रकल्प राबविण्यात येणार

गोंदिया : मुख्यमंत्री यांच्या संकल्पनेतून व्यापक प्रभाव असलेला भव्य जल सिंचन प्रकल्प रोजगार हमी योजनेअंतर्गत स्थानिक नागरिकांच्या जीवनावर सकारात्मक व्यापक परिणाम होईल, असा भव्य जल सिंचन प्रकल्प गोंदियात राबविण्यात येणार आहे.

ॲक्सिस बँक फाउंडेशन, भारत रुरल लाइव्हलीहूड फाउंडेशन यांच्यामध्ये परस्पर सहकार्याने झालेल्या सामंजस्य करार झाला असून गोंदिया जिल्ह्यामध्ये जल सिंचन प्रकल्प (हाय इम्पॅक्ट मेगा वॉटरशेड प्रोजेक्ट) राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश ग्रामपंचायतींना बळकटीकरण करुन कामांचे नियोजन, संनियंत्रण व अंमलबजावणी करण्याकरीता ग्रामपंचायतींना सहयोग करण्यासाठी भारत रुरल लाइव्हलीहूड फाउंडेशन द्वारे १० सिव्हिल सोसायटी ऑर्गनायझेशनची निवड करण्यात आली आहे. प्रत्येक सिव्हिल सोसायटी ऑर्गनायझेशन दोन तालुक्यांमध्ये काम करणार आहे. सदर प्रकल्प पाच वर्षापर्यंत राबविण्यात येईल. सदर प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता राज्यस्तरावर भारत रुरल लाइव्हलीहूड फाउंडेशनचे एसपीएमयुची स्थापना करण्यात आलेली आहे. २६ तालुक्यांमध्ये एकूण ८७८ लघु पाणलोट क्षेत्राचे विकास करणे आहे, हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. त्या माध्यमातून ४.३९ लक्ष हेक्टर जमिनीचे क्षेत्र सिंचित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आहे. कमीत कमी एक लक्ष शेतकऱ्यांचे उत्पन्न सिंचित करणे. जवळपास १.७७ लक्ष हेक्टर असिंचित जमीन सिंचित करणे. ८०० ग्रामरोजगार सेवक व ६००० आरपीआय व बचतगट सदस्यांना डीपीआर व लाइव्हलीहूड प्लॅनच्या प्रभावी नियोजन व अंमलबजावणीकरीता प्रशिक्षण देणे. मृदा व जलसंधारणाच्या व्यवस्थापनाद्वारे जमिनीत ओलावा टिकवून ठेवणे तसेच पावसाच्या पाण्यावर कमी अवलंबून राहणे. बहुपीक प्रणालीला प्रोत्साहन देणे. मनरेगाच्या निधीचा उपयोग करुन टिकाऊ व उत्पादक संरचनांची निर्मिती करणे ही या प्रकल्पाची उद्दिष्टे आहेत.

## रेती वाहतूक करणाऱ्या दोन ट्रॅक्टरवर कारावई

### १० लाखाचा मुद्देमाल जप्त

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

गोंदिया : अर्जुनी मोरगाव पोलिस ठाण्यांतर्गत येरंडीदेवी ते बाक्टी मार्गावर अवैधरित्या विनापास परवाना रेतीची वाहतूक करणाऱ्या दोन ट्रॅक्टरवर कारवाई करून पोलिसांनी एकूण १० लाख ७ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. ही घटना १६ जानेवारीची आहे.

आरोपी दीपक अशोक चांदेवार व निखील अशोक उपरीकर दोन्ही रा. सासरा ता. साकोली याने ट्रॅक्टर क्र. एमएच. ३४/एपी १८७० तसेच ट्रॅक्टर क्र. एमएच ३६/एजी ३४४७ मध्ये विनापास परवाना रेती भरून वाहतूक करीत असतांना पोलिसांनी येरंडीदेवी ते बाक्टी मार्गावर दोन्ही ट्रॅक्टर पकडून एकूण १० लाख ७ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. फिर्यादी पोशि. चरणदास सावरकर यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## पक्षी निरीक्षण कार्यक्रमाची सांगता



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

देवरी : सामाजिक वनीकरण देवरी यांच्या वतीने पक्षी निरीक्षण कार्यक्रमाचे आयोजन १७ जानेवारी रोजी करण्यात आले. सदर कार्यक्रम राष्ट्रीय हरित गुरुदेव विद्या मंदिर शाळा, शिरपूर बांध येथील मनोहर सागर (शिरपूर बांध) परिसरात पार पडले.

या कार्यक्रमात शाळेचे एकूण ९० विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी शाळेतील एस. यू. नंदेश्वर, एस. एस. इरले, जे. एस. कोसरकर हे शिक्षक उपस्थित होते. तसेच सामाजिक वनीकरण विभागाकडून आर. बी. उईके (वनपाल), व्हि. पी. कटरे (वनरक्षक), डी. बी. कुरसुंगे व यू. एल. संतोषवार यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांसोबत पक्षी निरीक्षण करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धन, जैवविविधता व पक्षी संरक्षणाबाबत जागरूकता निर्माण झाली. पक्षीविषयक माहिती पक्षी हे पर्यावरणातील महत्त्वाचे घटक असून ते परिसंस्थेचा समतोल राखण्यास मदत करतात. पक्ष्यांमुळे कीटक नियंत्रण, बीजप्रसार व परागीभवनास चालना मिळते. तलाव, नद्या व जंगल परिसरात आढळणारे पक्षी हे पर्यावरणाच्या आरोग्याचे निर्देशक मानले जातात. पक्षी निरीक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना विविध पक्ष्यांची ओळख, त्यांचे अन्न, निवासस्थान, स्थलांतर प्रक्रिया तसेच पक्षी संरक्षणाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. पक्ष्यांचे संवर्धन केल्यास नैसर्गिक जैवविविधता टिकवून ठेवण्यास मदत होते. याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

# गोंदियात ऑनलाईन फसवणूक रॅकेटचा पर्दाफाश

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

गोंदिया : स्थानिक लोकांची बँक खाती पैशाच्या आमिषाने मिळवून त्यांचा वापर ऑनलाईन फसवणुकीसाठी करणाऱ्या टोळीचा गोंदिया स्थानिक गुन्हे शाखा व सायबर सेलने पर्दाफाश केला आहे.छत्तीसगडच्या दंतेवाडा येथील दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. कारवाईत बँक खाते, चेकबुक, सिम कार्ड व तीन अँड्रॉइड मोबाईलसह ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

शहरातील रामनगर पोलिस स्टेशन हद्दीत १५ जानेवारी रोजी पेट्रोलिंग दरम्यान पोलिसांना शहरातील तिरोडा मार्गावरील हॉटेल आर्चिड येथे काही इसम ऑनलाईन आर्थिक गैरव्यवहार करीत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. माहितीच्या आधारे पोलिसांनी हॉटेलमध्ये छापा टाकून दोन इसमांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी त्यांची नावे शेख आसिफ शेख अहमद (२७) व सचिनकुमार संतोष पटेल (२२), दोन्ही रा. दंतेवाडा, छत्तीसगड अशी सांगितली.दहत्र्हा र्ङ्मिव्रू पोलिसानी त्यांना विचारण केली असता पैशाचे आमिष दाखवून स्थानिक नागरिकांकडून बँक खाती उघडून, खातेदारांचे सिम कार्ड व संपूर्ण बँक किट ताब्यात घेवून त्यांच्या खात्याचा वापर ऑनलाईन गेमिंग व अन्य डिजिटल माध्यमांतून आर्थिक व्यवहार करून फसवणूक करण्यासाठी केला जात असल्याचे सांगितले. आरोपींच्या ताब्यातून



बँक ऑफ इंडियाचे करंट खाते, चेकबुक, सिम कार्ड व तीन अँड्रॉइड मोबाईल फोन असा ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी रामनगर पोलिस ठाणे येथे आरोपींविरूद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१९(२), ३१८(४), ३३८, ३३६(३), ३४०(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक गोरख भामरे यांच्या निर्देशानुसार व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक पुरुषोत्तम अहेरकर यांच्या मार्गदर्शनात महिला पोलिस उपनिरिक्षक वनिता सायकर, पोलिस हवालदार प्रकाश गायधाने, महेश मेहर, दीक्षित दमाहे, संजय चव्हाण, इंद्रजित बिसेन, पोलिस शिपाई संतोष केदार, दुर्गेश पाटील, प्रमोद सोनवाने, रोशन येरणे, चालक पोलिस शिपाई खंदारे यांनी केली आहे.

युवाराष्ट्र दर्शन
# भंडारा जिल्हा
रविवार दि.१८ जानेवारी २०२६

## बेला येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा :** पीएमश्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा बेला येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती विविध उपक्रमातून साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक महारुद्र केंद्रे यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या फोटोला माल्यार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात केली. शिक्षक अनंता गावंडे यांनी विद्यार्थ्यांना स्वामी विवेकानंद व जिजामाता यांचा जीवनपरिचय करून दिला. शिक्षिका सुचिता बडगे यांनी विद्यार्थ्यांना युवक दिनाबद्दल माहिती सांगितली. शिक्षिका किरण बडवाईक यांनी जिजामाता यांची बोधात्मक कथा सांगून विद्यार्थ्यांना बोलके केले.

युवकदिन व जिजामाता जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांच्या चित्रकला स्पर्धा वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा व गीतगायन स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेच्या यशस्वीततेसाठी सोमेश्वर मस्के व योगेश बकाल यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका नर्मदा भेदे व आभार प्रदर्शन शिक्षिका सीमा उताणे यांनी केले.

युवाराष्ट्र दर्शन
पत्रकार होण्याची सुवर्णसंधी
दैनिक युवाराष्ट्र दर्शन
वृत्तपत्राकरीता भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदुर,पवनी येथे तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे आहे. तसेच गाव पातळीवर वार्ताहर नियुक्त करणे आहे.
संपर्क मो.: ९९२३०७०३९२

# सनफ्लॅग कंपनीत कामगाराचा मृत्यू ,नागरीकांचा तीव्र संताप

## कंपनीच्या गेट समोर मृतदेह ठेऊन आंदोलन | काही काळ तणावाचे वातावरण

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा :** मोहाडी तालुक्यातील वरठी येथील सनफ्लॅग स्टील कंपनीत एका कामगाराचा अपघाती मृत्यू झाला. यानंतर तप्त झालेल्या कामगारांनी मृत कामगाराचे शव प्रवेशद्वारा पुढे ठेवून विविध मागण्यांसाठी आंदोलन केले. मृतकाच्या कुटुंबियास एक कोटीची मदत व दोन सदस्यांना नौकरी अशी मागणी आंदोलकानी केले.शेवटी चर्चे दरम्यान सनफ्लॅग व्यवस्थापक मंडळाने काही मागण्या मान्य केल्याने सायकाळी ५ वाजेदरम्यान मृतदेह अंत्यविधीसाठी उचलण्यात आले. यावेळी मृतकाच्या कुटूंबियांसह शेकडो नागरीक आंदोलनात सहभागी



झाले होते.मारोती महादेव भिवगडे (४५ ) रा.पाचगाव ता.मोहाडी जि.भंडारा असे मृत कामगाराचे नाव आहे. हि घटना १७ जानेवारी रोजी सकाळी दहा वाजेदरम्यान सनफ्लॅग कंपनीतील एसएमएस विभागात घडली.

कंपनीत क्रेन ऑपरेटर म्हणून कार्यरत असलेले पाचगाव येथील मारुती भिवगडे आज १७ रोजी कर्तव्यावर असताना ७० फूट उंचीवरून खाली पडले. जखमी अवस्थेत उपचारासाठी त्यांना रुग्णालयात देण्यात आले मात्र त्यांचा मृत्यू झाला. सकाळी १० वाजताच्या घडलेल्या या घटनेनंतर शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या सुपूर्द करण्यात आला. परंतु



तो घरी न नेता नातेवाईकांनी आणि कंपनीच्या प्रवेशद्वारा पुढे आंदोलन सुरु केले. सनफ्लॅग कंपनी व्यवस्थापक मंडळाने कामगाराच्या सुरक्षेबाबत कुठल्याच उपयोजना केल्या नसल्याने मारोती भिवगडे याचा नाहक जीव गेला असा आरोप यावेळी आंदोलकांनी केला. आंदोलनामुळे काही काळ वातावरण चिघळले.

घटनेची माहिती मिळताच तुमसर विधानसभा क्षेत्राचे आमदार राजू कारेमोरे, माजी आमदार चरण वाघमारे यांच्यासह परिसरातील नागरीक मोठया संख्येने आंदोलनस्थळी दाखल झाल्याने काही काळ वातावरण चिघळले होते. यावेळी आंदोलनकर्त्यांनी सनफ्लॅग कारखान्याविरोधात जोरदार घोषणाबाजी दिली. नागरीकांचा वाढता रोष लक्षात घेत प्रशासनाने सनफ्लॅग व्यवस्थापक मंडळ व आंदोलनकर्त्यांत चर्चा घडवून आणली. चर्चेअंती कंपनी प्रशासनाने मृत पावलेल्या कामगाराच्या कुटुंबातील एकाला नौकरी देण्याचे आश्वासन दिले.शिवाय सर्व मार्गातुन मृतकाच्या कुटुंबियांना जवळपास ३० लक्ष रूपयाची मदत, मृतकाच्या मुलाला आयटीआय किंवा पोलिटेक्निक करण्यासाठी कंपनीतर्फे सर्वतोपरी मदत तसेच सानुग्रह निधी म्हणून तात्काळ २ लक्ष रुपयाची मदत देण्याचे लिखित आश्वासन सनफ्लॅग व्यवस्थापन मंडळाचे रामचंद्र दळवी यांनी दिले . शेवटी सायंकाळी ५ वाजेदरम्यान मृतदेह अंत्यविधी करीता उचलण्यात आले.

यावेळी पोलिसांचा मोठा फौजफाटा दिसून आला.यात एसडीपीओ साकोली शिवम विसापुरे, पोलीस उपनिरीक्षक अभिजित पाटील वरठीचे ठाणेदार निलेश गिरी , मोहडीचे ठाणेदार सुरेंद्र बेलखेडे ,जवाहरनगरचे ठाणेदार भिमाजी पाटील ,कारधाचे ठाणेदार गोकुल सूर्यवंशी, भंडारा ठाणेदार उल्हास भुसारी, तुमसरचे ठाणेदार संजय गायकवाड ,लाखनीचे ठाणेदार सुभाष बारसे व मोठया संख्येने पोलीस कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती

# इसमाची विहिरीत उडी घेऊन आत्महत्या



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**लाखांदूर :** तालुक्यातील अंतरगाव परिसरातील शेतशिवारात एका ५२ वर्षीय इसमाने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना आज, शनिवारी सकाळी उघडकीस आली.प्रदीप दयाराम कुडेगावे (वय ५२), रा. लाखांदूर वॉर्ड क्र. ३, असे मृत व्यक्तीचे नाव आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून आत्महत्येचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रदीप दयाराम कुडेगावे (वय ५२), रा. लाखांदूर वॉर्ड क्र. ३, असे मृत व्यक्तीचे नाव आहे. प्रदीप कुडेगावे हे शुक्रवार, १६ जानेवारीपासून बेपत्ता होते. कुटुंबीय त्यांचा शोध घेत असतानाच, आज शनिवार (दि. १७ जानेवारी) रोजी सकाळी आठ वाजेच्या सुमारास चिचोली-अंतरगाव परिसरातील एका शेतातील विहिरीजवळ काही नागरिकांना चपला आणि मोबाईल आढळून आले. विहिरीजवळ वस्तू बेवारस स्थितीत दिसल्याने कोणातरी व्यक्तीने विहिरीत उडी घेतल्याचा संशय नागरिकांनी व्यक्त केला. याची माहिती तात्काळ लाखांदूर पोलिसांना देण्यात आली.

घटनेची माहिती मिळताच लाखांदूर पोलीस स्टेशनचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने विहिरीची तपासणी केली असता, त्यात प्रदीप कुडेगावे यांचा मृतदेह आढळून आला. पोलिसांनी मृतदेह विहिरीबाहेर काढून पंचनामा केला आणि शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठवला.

प्रदीप कुडेगावे यांनी इतके टोकाचे पाऊल का उचलले, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. लाखांदूर पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# भावड येथे शंकराच्या मुर्तीची विटंबना

- तिसऱ्यांदा घडली घटना
- आज भव्य मोर्चा

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**पवनी :** तालुक्यातील भावड येथील भगवान शंकर मंदिरातील शंकराच्या मुर्तिची तोडफोड करुन विटंबना केल्याने नागरिकांमध्ये प्रचंड संतापाचे वातावरण आहे. या घटनेची दखल घेत पोलीस प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी, स्थानिक आमदारांनी घटनास्थळी भेट देत परिस्थिती हाताळली. दरम्यान उद्या या अनुषंगाने मोर्चा काढण्यात येत असल्याचे समजते.

पवनी तालुक्यात असलेल्या भावड येथे भगवान शंकरजी देवस्थान नावाने मंदिर आहे. आज सकाळी भाविक दर्शनासाठी गेले असता त्यांना भगवान शंकराच्या मूर्तीची तोडफोड केली गेली असल्याचे लक्षात आले. चेहरा आणि दोन्ही हाताला पूर्णपणे विद्रूप करण्यात आले होते. याची माहिती पसरताच ग्रामस्थ आणि परिसरातील नागरिकांनी मंदिराकडे धाव घेतली. यावेळी प्रचंड संताप नागरिकांमध्ये होता. लक्षात घेता अड्याळ पोलीस ठाण्याचे अधिकारी दाखल झाले. यापुर्वीही दोनदा याच मंदिरात शंकराच्या मुर्तिची विटंबना करण्यात आली होती. तिसऱ्यांदा हा प्रकार घडल्याने नागरिक चांगलेच संतापले.

मुर्तिची विटंबना करणाऱ्यांना ताबडतोब अटक करा अशी मागणी त्यांनी लावून धरली. दरम्यान परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता पोलिस अधीक्षक नुरुल हसन आणि अन्य अधिकारी दाखल झाले होते. आ. नरेंद्र भोंडेकर सुद्धा घटनास्थळी आले. यावेळी पोलिस प्रशासनासोबत चर्चा झाली. या प्रकरणातील आरोपींना ताबडतोब अटक करावी, या मागणीसाठी उद्या १८ रोजी भावड ते अड्याळ पोलिस ठाण्यापर्यंत मोर्चा काढण्यात येणार आहे.

## हिंदुच्या आस्था स्थळांवर हल्ले खपवून घेणार नाही : आ.भोंडेकर



पवनी तालुक्यातील भावड येथील शिव मंदिरात महादेवाची मूर्ती तिसऱ्यांदा फोडण्याची घटना अत्यंत निंदनीय असून हिंदू समाजाच्या श्रद्धेवर केलेला थेट हल्ला आहे. अशा प्रकारच्या घटना कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतल्या जाणार नाहीत, असा खणखणीत इशारा आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी दिला आहे. उद्या सकाळी १० वाजेपर्यंत दोषींवर ठोस कारवाई झाली नाही, तर अड्याळ पोलीस स्टेशन येथे तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी प्रशासनाला दिला आहे.

भावड येथील शिवमंदीरातील महादेवाची मुर्ती फोडण्यात आल्याचे माहित होताच आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी भावड गाठले,लगेच परिसरातील हजारो हिंदू बांधव घटनास्थळी दाखल झाले व स्वयंस्फूर्त पणे रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.अनेक नेत्यांनी आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्यानंतर आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी प्रशासनाला २४ तासाचा अल्टीमेटम देवून आरोपीला अटक न केल्यास उद्या सकाळी १० वा भावड ते अड्याल पोलिस स्टेशन पर्यंत भव्य मोर्चा काढण्याचा इशारा दिला.

यावेळेस शिवसेना लोकसभा संपर्क प्रमुख संजय कुंभलकर, उपजिल्हाप्रमुख सुरेश धुर्वे,पवनी तालुका प्रमुख प्रशात भूते,किशोर पंचभाई, आशिष माटे,राजेंद्र ब्राह्मणकर, उपसभापती प्रमोद मेन्ढे,जितेश लिचडे, नेताजी नागरिकर, नाना उपरीकर आदी उपस्थित होते.

# स्प्रिंग डेल शाळेत ‘खाऊचा डबा’ स्पर्धा




**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा :** स्थानिक सनीज स्प्रिंग डेल शाळेच्या आवारात दि.१७ जानेवारी २६ रोजी ‘खाऊचा डबा’ या शीर्षकाखाली पालकांसाठी पोषक आहार स्पर्धेचे आयोजन केले गेले.पालकांनी विद्यार्थ्यांसाठी सकस आहारात येणाऱ्या विविध पदार्थांचे स्टॉल लावले. या स्पर्धेचे उद्घाटन व परीक्षण सत्यम एज्युकेशन सोसायटीच्या कोषाध्यक्षा सौ.शुभांगी मेंढे,सौ.सीमा गोंडनाले, आहारतज्ञ डॉ. सौ.प्रिती चोले यांनी केले.या स्पर्धेत पालकांनी ७० स्टॉल लावून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या स्पर्धेची संकल्पना सत्यम एज्युकेशन सोसायटीचे संचालक सुनिल मेंढे यांची होती.या स्पर्धेचे परिक्षण पदार्थाची चव, पदार्थाचे सादरीकरण, पदार्थातुन मुलांना मिळत असलेले पोषणतत्व या परिमाणावर करण्यात आले.

या स्पर्धेत सौ.रोहिणी कुंभलकर यांनी रोख रकमेसोबत प्रथम,सौ.शीतल खेडीकर यांनी द्वितीय व तृतीय पारितोषिक सौ.रिया आस्वले व सौ. श्रद्धा येरपुडे यांनी संयुक्तपणे पारितोषिक पटकावले.

सौ.ज्योती पटेल व सौ.नीलम पटेल, सौ.पल्लवी लोनडांसे, सौ.दिप्ती क्षत्रिय, सौ. राजेश्री चोळकर, सौ.पिंकी मेश्राम, सौ. रोहणी दादगये, सौ.सोनाली बोरकर यांनी प्रोत्साहनपर पारितोषिक पटकावले.

या आनंद मेळाव्यात ५०० पालकांनी विद्यार्थ्यांसह खवय्येगिरी केली.



## न्यू तुलसी नगर येथे हळदी-कुंकु कार्यक्रम

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा :** शहरालगतच्या न्यू तुलसी नगर केसलबाडा येथे आज दि.१७ जानेवारी रोजी हळदी कुंकु कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रसंगी भंडारा नगराध्यक्ष सौ. मधुराताई मिलिंद मदनकर , ग्रामपंचायत सदस्य सुनंदाताई बडवाईक,सौ. प्रीती आशु वंजारी, रोहणीताई चोपकर, रंजना ब्राह्मणकर, ममता ताई सलामे, पल्लवी ताई कुंभारे, ममता येरणे, संगीता ताई चव्हाण, नंदिनी ताई बडवाईक, विद्याताई ईश्वरकर, रोली गुरुवेकर, सुरेखाताई बोंद्रे, सुनिता साठवणे, अमृता निनावे, निमा चारमोडे, जागृती देशमुख, सीमा मलोडे, सोनाली ताई धोटे, दुर्गा कुंभार, प्रतिभा कुंभारे, मंजुषा पांडे, संतोषवारताई, छायाताई शेलोकर, रंजूताई माटे तसेच महिला उपस्थित होत्या.

# सत्ताधाऱ्यांवर अधिकाराच्या दुरूपयोगाचा आरोप

## तुमसरात स्वीकृत सदस्य निवडीवरून वादंग

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**तुमसर :** तुमसर नगर परिषदेच्या उपाध्यक्ष आणि स्वीकृत सदस्यांच्या निवडीसाठी १६ जानेवारी शुक्रवार रोजी आयोजित विशेष सभा वादाच्या भोवऱ्यात सापडली. या सभेत सचिन बोपचे यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली, मात्र स्वीकृत सदस्यांच्या निवडीवरून सभागृहात एकच गोंधळ उडाला. कायद्याने सुचवलेल्या नियमांनुसार आणि सदस्यसंख्येच्या गुणोत्तरानुसार ही प्रक्रिया पार पडली नसल्याचा आरोप करत विरोधी गटाने नगराध्यक्ष सागर गभने यांच्या निर्णयावर तीव्र आक्षेप घेतला. या गोंधळामुळे पालिकेच्या पहिल्याच सभेतील राजकीय वातावरण तापले.

नगर विकास विभागाच्या २ फेब्रुवारी २०१० च्या अधिसूचनेनुसार आणि महाराष्ट्र नगर परिषद अधिनियमातील तरतुदीनुसार गटांची निर्मिती आणि गटनेत्यांच्या सूचना विचारात घेणे बंधनकारक असते. मात्र, सभेच्या दुसऱ्या ठरावात प्रमोद तितिरमारे, शैलेश मेश्राम आणि हितेश चोपकर यांची स्वीकृत सदस्य म्हणून झालेली निवड वादग्रस्त ठरली आहे.

माजी नगराध्यक्ष अभिषेक कारेमोरे यांनी या निवडीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना सांगितले की, ११ सदस्यांच्या मोठ्या गटातून सदस्याची निवड का केली गेली नाही? अपूर्णांकाचे गणित मांडताना कायद्यातील तरतुदींचा चुकीचा अर्थ लावून अल्पसंख्या असलेल्या गटाला झुकते माप दिल्याचा आरोप त्यांनी केला असून याविरोधात कायदेशीर लढा देण्याचा पवित्रा घेतला आहे.

> स्वीकृत सदस्य निवडण्याचे सर्वाधिकार नगराध्यक्षांचे आहेत. २०१६ च्या शासन निर्णयानुसार व जिल्हाधिकारी कार्यालयातून प्राप्त अंतिम नामनिर्देशन पत्रांमधूनच ही निवड करण्यात आली. यात कोणत्याही नियमाचे उल्लंघन झालेले नाही.
>
> **सागर गभने,**
> **नगराध्यक्ष, तुमसर.**

> नगरपरिषदेत स्वीकृत सदस्यांची नगराध्यक्षानी केलेली निवड बेकायदेशीर असून महाराष्ट्र नगरपरिषद औद्योगिक अधिनियम, १९६५ चे उल्लंघन व अधिकाराचा गैरवापर केलेला आहे. त्यामुळे याविरोधात न्यायालयीन लढाई लढणार आहे.
>
> **अमर रगडे,**
> **माजी नगराध्यक्ष,**
> **नगरपरिषद तुमसर.**

# पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियानाचे जिल्हास्तरीय उद्घाटन

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा :** महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सिकलसेल आजाराचा जास्त प्रादुर्भाव असलेल्या राज्यातील २१ जिल्ह्यांमध्ये अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान राबविण्यात येत असून, त्यामध्ये भंडारा जिल्ह्याचा समावेश आहे. या अनुषंगाने जिल्हा आरोग्य विभागामार्फत भंडारा जिल्ह्यात १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

या अभियानाचे जिल्हास्तरीय उद्घाटन पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते फीत कापून, दीपप्रज्वलन




व माहिती पुस्तिकेचे अनावरण करून उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

उद्घाटनप्रसंगी जिल्हाधिकारी सावनकुमार, पोलीस अधीक्षक नुरुन हसन, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मिलिंद सोमकुंवर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संदीप गजभिये, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अतुल टेभूर्णे, जिल्हा माहिती अधिकारी शैलजा वाघ, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी अनिल बनकर, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. अजिंक्य आंबाडकर, कार्यक्रम समन्वयक रोहिणी पवार आदी उपस्थित होते.यावेळी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, सिकलसेल ॲनिमिया हा पिढ्यानपिढ्या काही समुदायांमध्ये आढळणारा गंभीर आजार असून, त्याचे प्रमाण विशेषतः विदर्भात अधिक आहे. या आजाराच्या नियंत्रणासाठी व भविष्यात समूळ उच्चाटनासाठी जनजागृती आणि तपासणी अत्यंत आवश्यक आहे. प्रशासनाने अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करावी तसेच नागरिकांनी स्वतःसह कुटुंबातील सर्व सदस्यांची तपासणी करून या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमास नर्सिंग स्कूलच्या विद्यार्थिनी, आरोग्य कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित सिकलसेल रुग्ण व वाहकांना सिकलसेल कार्डचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. श्रीकांत आंबेकर (साथरोग शास्त्रज्ञ) यांनी केले.

